दैनिक कर्नाळा जनहिताचा निर्वाळा

NIRAMAYA HOSPITALS
MAY ALL BE HEALTHY

**NIRAMAYA HOSPITALS**
**Publication:** Karnala
**Main Edition:**
**Date:** 25 May, 2013
**Page No:** 03
**Edition:** Raigad, Navi Mumbai (Print & Online)

---

# अध्ययन अक्षमतेवर मोफत मार्गदर्शन शिबिर

प्रतिनिधी

**खारघर, दि. २२ :** लहान मुलांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण करण्यासाठी खारघरमध्ये अध्ययन अक्षमतेविषयी विशेष मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते. सध्याच्या शिक्षणविषयक जीवघेण्या स्पर्धांचा परिणाम लहान मुलांमध्ये होताना दिसत आहे. यामुळे शाळेत शिकताना किंवा अभ्यास करताना मुलांमध्ये पालकांना काही समस्या आढळून आल्या तर त्यांनी तत्काळ तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. शाळेत शिकविल्या जाणऱ्या पद्धतीचा मुलांवर परिणाम होतो. यामुळे शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी अध्ययन अक्षमतेवर आधारित पहल या सामाजिक संस्थेच्या वतीने निरामय रुग्णालयात मोफत मार्गदर्शन शिबिर ठेवले होते. याचा परिसरातील मुलांनी लाभ घेतल्याचे पहलच्या संस्थापक अमिता थडानी यांनी सांगितले.